**जिल्हाधिकारी, अहमदनगर**

**(पुरवठा शाखा)**

**ई-निविदा सूचना सन २०१७-२०२०**

जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडून अहमदनगर जिल्हयासाठी लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत धान्य उपलब्धतेच्या हमीकरीता निश्चीत केलेल्या सुधारीत धान्य वितरण पध्दतीनुसार भारतीय अन्न महामंडळ गोदाम ते शासकीय गोदाम व शासकीय गोदाम ते स्वस्त धान्य दुकानापर्यत एकाच वाहतुकदारामार्फत शासकीय खर्चाने विविध योजनेतील अन्नधान्य व इतर जिवनावश्यक वस्तू त्याचप्रमाणे साखरेची सुध्दा रस्त्याने वाहतुक करणेकामी इच्छुक वाहतुक कंत्राटदाराकडून ई-निविदा दि.१५/०६/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यत ई-निविदा (ऑनलाईन) पध्दतीने मागविण्यात येत आहेत..

मुदतीत आलेल्या निविदा जिल्हाधिकारी, अहमदनगर अगर त्यांचे प्रतिनिधी दि.१६/०६/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे उघडतील. त्यावेळी सर्व इच्छुक निविदाधारकांनी अगर त्यांचे अनुपस्थितीत त्यांनी लेखी प्राधिकार दिलेल्या प्रतिनिधीनी हजर राहावे.

निविदेचा नमुना, त्यातील अटी व शर्ती इत्यादी तपशील जिल्हाधिकारी, अहमदनगर (पुरवठा शाखा) यांचे कार्यालयात कामाचे दिवशी सकाळी ११ ते दुपारी ४.०० वाजेपर्यत पाहवयास मिळेल.

निविदासंबधीची सर्व माहिती व अटी-शर्ती http://mahatenders.gov.in व www.ahmednagar.nic.in या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत धान्य उपलब्धतेच्या हमीकरीता निश्चीत केलेल्या सुधारीत वितरण पध्दतीनुसार सन २०१७ ते २०२० या कालावधीसाठी अन्नधान्य व इतर जिवनावश्यक वस्तूंचे वाहतुक कंत्राट निश्चीत बाबतच्या अटी व शर्ती.....

**१) सुधारीत वाहतुक पध्दत:-**

१.१ **थेट वाहतुक** - सुधारीत वितरण पध्दतीनुसार लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्याची मनपा क्षेत्रासाठी भारतीय अन्न महामंडळाच्या बेस डेपोपासून शिधावाटप दुकानापर्यत अन्नधान्य, साखर (निर्धारीत गोदामापासून) इत्यादी शिधावस्तूंची थेट वाहतुक केली जाईल.

१.२ **पहिल्या टप्प्याची वाहतुक** - थेट वाहतुक वगळता भारतीय अन्न महामंडळाच्या बेस डेपोपासून शासकीय धान्य गोदामापर्यतची अन्नधान्य, साखर (निर्धारीत गोदामापासून इत्यादी शिधावस्तूंची पहिल्या टप्प्याची थेट वाहतुक करण्यात येईल.

पहिल्या टप्प्याअंतर्गत जिल्हा मुख्यालयाच्या शहरांमध्ये जेथे भारतीय खादय निगमाचा बेस डेपो व शासकीय धान्य गोदाम एकाच शहरात आहेत अशा ठिकाणी भारतीय अन्न महामंडळाच्या बेस डेपोपासून (साखरेसंदर्भात निर्धारीत गोदामापासून) शिधावाटप दुकानापर्यंत अशी थेट वाहतुक करण्यात येईल त्यासाठी थेट वाहतुकीची कार्यपध्दती लागू असेल.

१.३ **दुस-या टप्प्याची वाहतुक** - शासकीय धान्य गोदामापासून शिधावाटप दुकानापर्यंत अन्नधान्य, साखर इ. शिधावस्तू पोहविण्याकरीता दुस-या टप्प्याची वाहतुक करण्यात येईल.

१.४ शासनाच्या वतीने लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत विविध योजनेतील अन्नधान्य (साखरेसह) व इतर शिधावस्तूच्या वाहतुक कंत्राट निश्चीतीकरीता खुल्या ई-निविदा मागविणे, निविदा प्रक्रिया पुर्ण करणे व दर मंजूर झालेल्या निविदाकाराशी विहीत कालावधीत करारनामा करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची असेल.

१.५ निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडणे, निविदाकारास तांत्रिकदष्टया पात्र ठरविणे, दराचा लिफाफा उघडणे व प्रदान केलेल्या अधिकार मर्यादेमध्ये निविदा मंजूर करणे इ. अधिकार शासन निर्णायानुसार गठीत केलेल्या जिल्हास्तरीय निविदा समितीस आहेत.

**२) वाहतुकीकरीता आधारभूत दर वाहतुकीच्या पध्दतीनुसार निविदा प्रक्रियेसाठी निर्धारीत केलेले आधारभूत दर पुढीलप्रमाणे आहेत.**

| **वाहतुकीची पध्दती** | **आधारभूत दर (रु.प्रति क्विंटल) संपुर्ण अंतराकरीता** |
|---|---|
| थेट वाहतुक जिल्हयातील मनापा क्षेत्रासाठी | ७०.०० |
| पहिल्या टप्प्याची वाहतुक * | ४८.०० |
| दुस-या टप्प्याची वाहतुक | ४०.०० |

* पहिल्या टप्प्याच्या वाहतुकीचे प्रति क्विंटल दर हे जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी प्रस्तावित थेट वाहतुकीसाठी लागू असतील.

अपरिहार्य कारणास्तव नियमित बेस डेपोमधून नियतन उपलब्ध करुन देण्यास भारतीय अन्न महामंडळाने असमर्थता दर्शविल्यास पर्यायी डेपोतून किंवा अन्य जिल्हयातील बेस डेपोतून वाहतुक करावी लागल्यास अशा वाहतुकीसाठी जिल्हयास बेस डेपोच्या अंतराच्या प्रमाणात जितकी टक्के वाढ होईल तितके टक्के मंजूर क्विंटल दरामध्ये देण्यात येईल.

**३) निविदेच्या पात्रतेचे निकष व अटी-शर्ती** -

निविदाकाराने निविदा भरताना पुढील बाबींचा विचार करुन निविदा दर भरावेत.

३.१ (अ) निविदाकाराने निविदा दर भरताना केंद्र व राज्य शासनाचे सर्व प्रकारच्या करासहीत निविदेत दर नमुद करावेत.

**३.१ (ब) आर्थिक अनुभव/कुवत -**

निविदाकारास मागील किमान एक वर्षाचा वाहतुकीचा अनुभव असावा. निविदाकाराचा सरकारी/निमसरकारी वाहतुकीचा अनुभव निश्चीत विचारात घेण्यात येईल. मात्र तांत्रिक पात्रतेची अट असणार नाही.

लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वाहतुक करण्याची निविदाकाराची आर्थिक कुवत असणे आवश्यक आहे., त्यासाठी निविदाकाराचा मागील एक वर्षाचा केवळ वाहतुकीचा एकूण किमान आर्थिक व्यवहार (Turnover) वाहतुकीच्या पध्दतीनुसार खालीलप्रमाणे असेल.

| वाहतुकीची पध्दत | आर्थिक व्यवहार |
|---|---|
| थेट वाहतुक | रु १.०० कोटी |
| पहिल्या व दुस-या टप्प्याची वाहतुक | रु १.५० कोटी |

**३.२ इसारा रक्कम:-**

३.२.१ निविदेसोबत पुढील प्रमाणे इसारा रक्कम घेण्यात येईल.

| वाहतुकीची पध्दत | इसारा रक्कम |
|---|---|
| थेट वाहतुक | रु १०.०० लक्ष |
| पहिल्या व दुस-या टप्प्याची वाहतुक | रु १५.०० लक्ष |

३.२.२ इसा-याची रक्कम ऑनलाईन/धनाकर्ष रुपात भरण्यात यावी.

३.२.३ ज्यांनी इसारा रक्कम भरलेली असेल,त्यांना निविदा भरणे बंधनकारक आहे,निविदा न भरल्यास त्यांची इसा-याची संपुर्ण रक्कम जप्त करण्यात येईल.

३.२.४ विनिर्दिष्टीत केलेल्या इसारा रक्कमेपेक्षा कमी रक्कम भरणा-या निविदाधारकाची निविदा अपात्र ठरवून भरलेली संपुर्ण रक्कम जप्त करण्यात येईल.

३.२.५ इसारा रक्कम ज्या संस्थेचे नावे अथवा खाजगी व्यक्ती चे नावे टेंडर भरण्यात येणार आहे त्यांचे नावेच इसारा रक्कम भरणा करावयाची आहे.

३.२.६ निविदा उघडल्यानंतर न्युनतम निविदाकाराव्यतिरीक्त उर्वरीत सर्व पात्र व अपात्र निविदाधारकांची इसारा रक्कम ७ दिवसात परत करण्यात यंईल.

३.२.७ इसारा रक्कमेवर कुठल्याही प्रकारे व्याज देय राहणार नाही.

**३.३ बँक गॅरंटी :-**

३.३.१ निविदा मंजुर केल्यानंतर करारनामा करण्यापुर्वी साडेतीन वर्षाची मुळ बँक गॅरंटी खालील प्रमाणे घेण्यात येईल.

| वाहतुकीची पध्दत | बँक गॅरंटी रक्कम |
|---|---|
| थेट वाहतुक | रु १.०० कोटी |
| पहिल्या व दुस-या टप्प्याची वाहतुक | रु १.५० कोटी |

३.३.२ बँक गॅरंटी ही केवळ अनुसूचित अथवा राष्ट्रीयकृत बॅकेची घेण्यात येईल.

**३.४ प्रतिभूती ठेवीची रक्कम** :-

३.४.१ ज्या निविदाकाराची निविदा मंजूर केली आहे त्या निविदाकाराची इसारा रक्कम प्रतिभूती ठेवीमध्ये परिवर्तित करण्यात येईल.

३.४.२ प्रतिभूती ठेवीच्या रकमेवर कुठल्याही प्रकारे व्याज देय राहणार नाही.

**३.५ बॅक गॅरेंटी व प्रतिभूती ठेव याचा वापर खालील परिस्थितीत करण्यात येईल.**

३.५.१ निविदाकाराने वाहतुकीचे काम अचानक थांबविल्यास पर्यायी वाहतुकीकरीता आलेल्या खर्चाच्या वसुलीसाठी.

३.५.२ निविदाकारावर आकारण्यात आलेला दंड वसुल करण्याकरीता अन्य मार्ग शिल्लक नसतील तर.

३.५.३ निविदाकाराचा वाहतुक ठेका संपलेला आहे परंतु त्याच्याकडून काही येणे आहे, वसुली आहे. ती वसुल करण्यासाठी अन्य मार्ग उपलब्ध नसतील तर सदरहु रक्कम प्रतिभूती ठेवी व बॅक गॅरेंटीमधून वसुल करण्यात येईल.

**(४) वाहतुक कंत्राटदाराच्या जबाबदा-या व कंत्राटाच्या अटी :-**

४.१ यशस्वी निविदाकारास वाहतुकीस उपयोगात आणावयाच्या वाहनांवर "लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्था सुधारीत धान्य वितरण पध्दत महाराष्ट्र शासन" असा नाम फलक लावावा लागेल.

४.२ जिल्हयातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपूर्ण संगणीकरण पूर्ण होईपर्यत वाहतुकदारास वाहनांना हिरवा रंग दयावा लागेल व वाहनांना स्वखर्चाने जीपीएस यंत्रणा बसवावी लागेल. त्याच्या संनियंत्रणाची सुविधा जिल्हा पुरवठा कार्यालयास उपलब्ध करुन दयावी लागेल.**सदर जीपीएस यंत्रणा कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी कार्यान्वित ठेवून त्याचे प्रात्यक्षिक दाखवणे गरजेचे राहील.**

४.३ वाहतुकीच्या पहिल्या टप्प्यामध्ये वाहतुकीदरम्यान दयावयाच्या हमाली/ वाराईचा खर्च अदा करण्याची त्याचप्रमाणे वाहतूकीच्या दुस-या टप्प्यामध्ये शिधावाटप दुकानदारास धान्य मोजून देणे व दुकानात थप्पी लावुन देण्याची जबाबदारी वाहतूकदाराची असेल.त्यासाठी येणा-या हमाली इ. खर्चाचा भार त्यास सोसावा लागेल. निविदा दर भरताना या सर्व बाबींचा विचार करुन त्यांनी दर भरावेत. थेट वाहतूकीसंदर्भात शिधावाटप दुकानदारास धान्य मोजून देण्यासाठी वाहनामध्ये वजन काटयाची व्यवस्था त्यास करावी लागेल.

४.४ लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्याचे नियतन केंद्र शासनाकडून राज्यास प्राप्त होते. सदर नियतनामध्ये काही महिन्यात अतिरिक्त नियतन प्राप्त होते. यामुळे जिल्हयाच्या नियतनानुसार प्रत्येक महिन्यात अधिक/ कमी अन्नधान्य नियतनाची वाहतूक करावी लागेल.

४.५ वाहतुक कंत्राटदारास अन्नधान्याची वाहतुक ही भारतीय अन्न महामंडळाच्या जवळच्या बेस डेपोपासून किंवा पर्यायी बेस डेपोपासून करावी लागेल.

४.६ अन्नधान्याच्या वाहतुकीकरीता प्रमाणित केलेल्या जवळच्या मार्गाव्यतिरिक्त इतर कोणत्याही मार्गाने अथवा आडमार्गाने धान्याची वाहतुक करण्यात येवू नये. आपत्कालीन परिस्थितीत (उदा. पूर परिस्थिती, अपघात इ.) नियोजित मार्गाव्यतिरिक्त अन्य पर्यायी मार्गाने वाहतूक करावी लागल्यास वाहतुकदारास जिल्हाधिकारी/ उप नियंत्रक शिधावाटप यांची लेखी परवानगी घ्यावी लागेल.

४.७ जिल्हाधिकारी व नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांनी आदेशित केल्यास शासनाच्या इतर योजनेअंतर्गतच्या अन्नधान्याच्या वाहतुकीचे कामसुध्दा त्यास करावे लागेल.

४.८ विहित मुदतीत अन्नधान्याची उचल न केल्यामुळे व्यपगत झालेल्या अन्नधान्याच्या बाजारभावाने होणा-या किमतीच्या १० टक्के रक्कम दंड म्हणून वाहतूक कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येईल. वारंवार अन्नधान्य व्यपगत करणा-या अकार्यक्षम वाहतूक कंत्राटदाराचे कंत्राट रदद करण्याची कारवाई करण्यात येईल.

४.९ **मालकीच्या व नियंत्रणाखालील आवश्यक वाहनांची एकत्रित वहन क्षमता :-**

| तपशील | वाहनाची किमान क्षमता (मे. टन) | किमान एकत्रित वहन क्षमता (मे. टन) | |
|---|---|---|---|
| | | स्वमालकीची वाहने | नियंत्रणाखालील वाहने |
| थेट वाहतुक | ९ | १०० मे. टन | १०० मे. टन |
| पहिला टप्पा वाहतूक | ९ | १०० मे. टन | १०० मे. टन |
| दुसरा टप्पा वाहतूक | २ | ५० मे. टन | ५० मे. टन |

४.१० भागीदारी संस्था (partnership firm / society,) सहकारी संस्थांच्या (co-operative society / firm ) बाबतीत भागीदार (partner)/संचालक (Director)/सभासदांच्या (member) नावे असलेली वाहने व त्यांचा अनुभव हे त्या भागीदारी संस्था/ सहकारी संस्थांच्या मालीकीची वाहने व या वाहनांचा मागील एक वर्षाचा व्यवहार हा संस्थेचा आर्थिक व्यवहार म्हणून विचारात घेण्यात येईल.

४.११ निविदाधारक खाजगी व्यक्ती (private firm/ Proprietary firm) असल्यास निविदेसोबत सादर केलेली मालकीची वाहने खुदद त्या खाजगी व्यक्तीच्या नावे असणे आवश्यक राहील.

४.१२ तांत्रिक पात्रतेकरीता निश्चीत केलेल्या मालकीच्या वाहनांची वाहनक्षमता व नियंत्रणाखालील वाहनांची वाहनक्षमता या दोन्हींच्या बेरजेएवढी वाहनक्षमता असलेली वाहने एखादया भागीदारी संस्था/सहकारी संस्था/खाजगी व्यक्तीच्या नावे मालकीचे असल्यास, नियंत्रणाखाली स्वतंत्र वाहने असण्याची आवश्यकता नाही.

४.१३ निविदेसोबत सादर करण्यात येणा-या मालकीच्या व नियंत्रणाखालील वाहनांच्या मालकीबाबत व ते संपुर्ण कंत्राट कालावधीकरीता वापरण्यास योग्य असल्याबाबत सक्षम परिवहन अधिका-याच्या प्रमाणपत्राची (R.C. Book with Fitness Certificate ) साक्षांकित केलेली सत्यप्रत निविदेसोबत जोडण्यात यावी.

४.१४ निविदेसोबत सादर करण्यात येणा-या मालकीच्या व नियंत्रणाखालील वाहनांमधून अन्न सुरक्षा व प्रमाणके कायदा २००६ मधील तरतूदीनुसार सिमेंट, खत, रासायनिक पदार्थ, कोळसा ज्यांच्यामुळे नंतरच्या अन्नधान्याच्या गुणवत्तेवर परिणाम होईल अशा वस्तूंची वाहतूक करण्यात आलेली नाही व कंत्राट कालावधीत ती करण्यात येणार नाही यासाठी संबंधीत यंत्रणेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४.१५ निविदाकारांकडे आवश्यक असलेल्या मालकीच्या व नियंत्रणाखालील वाहनांची किमान वहन क्षमता निश्चीत करण्यात आली असली तरी धान्याची वाहतूक विहीत वेळेत पूर्ण करण्यासाठी व त्यासाठी आवश्यक असल्यास अतिरीक्त वाहने उपलब्ध करून काम पूर्ण करण्याची सर्वस्वी जाबाबदारी वाहतूक कंत्राटदाराची असेल.

४.१६ वाहतूक कंत्राटदाराने त्यांच्या विश्वासातील प्रतिनिधी, परवानाधारक (Driving licence) वाहन चालक, वाहक, हमाल यांची नेमणूक करावी.

४.१७ वाहन वापराबाबत आणि वाहन भारक्षमता, वाहनांचे कर, विमा, प्रदुषण, चालक, मदतनीस, हमाल यांचा विमा, किमान वेतन इत्यादीबाबत शासनाच्या अस्तित्वात असलेल्या सर्व नियमांचे पालन करण्यास कंत्राटदार बांधील राहील.

४.१८ कामगार भरपाई अधिनियम अंतर्गत वाहतूकीच्या कामासाठी लावलेल्या कामगारांना दयावयाची नुकसान भरपाई, त्यांचे वेतन, सेवा इ. बाबत न्यायालयामध्ये दाखल होणा-या दाव्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी वाहतूक कंत्राटदाराची राहील.

४.१९ वाहतूक करताना येणा-या तुटीस वाहतूक कंत्राटदार स्वतः जबाबदार राहील. व येणा-या तुटीची रक्कम स्वतंत्रपणे विहित केलेल्या दरानुसार वाहतूक कंत्राटदारास दयावयाच्या मासिक देयकातून कपात करण्यात येईल.

४.२० वाहतूक कंत्राटदारास उपकंत्राटदाराची नियुक्ती करता येणार नाही.

४.२१ संपूर्ण निविदा अथवा निविदेचा काही भाग कोणतेही कारण न देता स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांचेकडेस राहील.

**५ निविदा पध्दती -**

५.१ निविदा पध्दती ही सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक मातंसं/नस्ती२०१२/प्रक्र २७३/३९ दि.२६ नोव्हेंबर २०१४ च्या शासन निर्णयानुसार ई-निविदा कार्यपध्दतीचा अवलंब करुन राबविण्यात येईल.

५.२ ई-निविदेसाठी अनुसरावयाची कार्यपध्दती आणि मार्गदर्शक सूचना http://mahatenders.gov.in या संकेतसस्थळावर उपलब्ध आहे त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

५.३ वाहतूक निविदेकरीता व्दिलिफाफा पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. यामध्ये पहिला लिफाफा हा तात्रिक लिफाफा असेल.ज्यामध्ये निविदाकाराची पात्रता सिध्द करणारे पुरावे व निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे स्वाक्षरीत केलेले दस्तऐवज असतील.दुसरा लिफाफा हा दरविषयक लिफाफा असेल ज्यात निविदाकाराने आपला दर नमुद करावा.

५.४ वाहतूक निविदेस तीन आठवडे किंवा कामाचे किमान १५ दिवस यापैकी जे जास्त असले तेवढया दिवसांकरीता प्रसिध्दी देण्यात येईल.

**५.५ तांत्रिक लिफाफा "अ" मध्ये पुढील कागदपत्रे सादर करावीत.**

| अ क्र | कागदपत्रांची सूची |
|---|---|
| १. | मुंबई दुकाने अधिनियम,१९५९ नुसार वाहतूक व्यवसाय नोंदणी दाखला |
| २. | भागीदारी फर्म / सहकारी संस्था असल्यास त्याबाबतचा करारनामा/नियमावली |
| ३. | निविदाकाराची अर्थिक कुवत /अनुभव दर्शविणारे चार्टड आकांऊटटचे प्रमाणपत्र |
| ४. | मालकीच्या व नियंत्रणाखालील वाहनाच्या आर सी बुक व फिटनेस प्रमाणपत्राच्या (संबंधीत सक्षम अधिका-यांनी दिलेल्या) साक्षाकिंत प्रती |
| ५. | निविदेत नमुद केल्या इतक्या वहन क्षमतेच्या पृष्ठयर्थ स्वत:च्या मालकीच्या वाहनांचे क्रमांक त्यांची क्षमता व मालकी इत्यादी बाबी दर्शविणारे विवरणपत्र |
| ६. | निविदेत नमुद केले इतक्या वहन क्षमतेच्या पृष्ठयर्थ नियंत्रणाखालील वाहनांचे क्रमांक त्यांची क्षमता व मालकी इत्यादी बाबी दर्शविणारे विवरणपत्र |
| ७. | इसारा रकमेचा धनाकर्ष (ऑनलाईन भरली नसले अशावेळी) |
| ८. | शासन निर्णयातील सर्व तरतुदी, अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे व त्यास बांधिल असल्याबाबतचे शपथपत्र |
| ९. | निविदाकाराचा PAN क्रमांक अथवा TAN क्रमांक यांची साक्षाकिंत प्रत |

५.६ तांत्रिक लिफाफा "अ" मधील कागदपत्रांची पुर्तता निविदा सादर करताना पुर्ण करण्यात येईल. तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर ऐनवेळी कागदपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत. तांत्रिक लिफाफयातील कागदपत्रात व अटी/शर्तीत नमुद केलेल्या अर्हतेपेक्षा कमी अर्हता आढळल्यास निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

५.७ शासनाला स्पर्धात्मक दर प्राप्त होणेसाठी ख-याखु-या निविदकारांना जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याची संधी देणे आवश्यक आहे हा दृष्टीकोन ठेवून विहीत केलेल्या अत्यावश्यक कागदपत्रांमध्ये काही किरकोळ स्वरूपाच्या त्रुटी असतील (उदा. शपथपत्रे, सांक्षाकिंत नसलेली कागदपत्रे इ.) व अशा त्रुटीची तात्काळ पुर्तता करुन शक्य असल्यास, व्यापारी लिफाफा उघडण्यापुर्वी अशा त्रुटी तात्काळ पुर्तता करण्याची परवानगी निविदाकारांना देण्यात येईल. अशा त्रुटी या वेळेत पुर्ण करता आल्या नाहीत तर मात्र ती निविदा अपात्र ठरविली जाईल.

५.८ निविदा प्रक्रियेदरम्यान तांत्रिक लिफाफा "अ" उघडल्यानंतर वाहतुक दराचा (व्यापारी दराचा) लिफाफा ब उघडण्यापुर्वी कोणत्याही निविदाधारकांचे तांत्रिक लिफाफया संदर्भात कोणतेही आक्षेप असल्यास अशा निविदाधारकांकडून आक्षेप लेखी घेण्यात येतील. कोणत्याही परिस्थितीत तोंडी आक्षेप मान्य करण्यात येणार नाहीत.

५.९ निविदाधारकाकडून लिफाफा "अ" म्हणजे तांत्रिक लिफाफयात आवश्यक असलेली कागदपत्रे सादर न केल्यास सदरची निविदा अपात्र ठरविण्यात येईल. अशा निविदेची लिफाफा ब (वाहतूक दर) उघडण्यास अपात्र ठरत असल्यास संबंधीत निविदाधारकाचे लिफाफा ब उघडण्याची व त्यातील दर विचारात घेण्याची लेखी किंवा तोंडी आग्रह/ विनंती कोणत्याही परिस्थितीत ग्राहय धरली जाणार नाही.

५.१० निविदा प्रक्रियेदरम्यान तांत्रिक लिफाफा "अ" उघडल्यानंतर निविदाधारकांचे तांत्रिक लिफाफयासंदर्भात कोणतेही आक्षेप नसल्यास सर्व पात्र व अपात्र निविदाधारकांकडून आक्षेप नसल्याबाबत तसे लेखी घेण्यात येईल. व आक्षेपाचे निराकरण करून दराचा लिफाफा उघडण्यात येईल.

५.११ निविदा प्रक्रियेदरम्यान तांत्रिक लिफाफा "ब" उघडल्यानंतर न्यूनतम दर नमुद केलेली निविदा पात्र ठरविण्यात येईल.

५.१२ निविदेमध्ये कोणतीही अट अथवा पर्याय निविदाधारकास देता येणार नाही अशा अटीयुक्त निविदा अपात्र ठरविण्यात येतील.

५.१२ निविदा कालावधीच्या अंतिम दिनांकापर्यत ३ पेक्षा कमी निविदाकार सहभागी झाल्याचे दिसून आल्यास किंवा तांत्रिकदृष्टया ३ पेक्षा कमी पात्र निविदा प्राप्त झाल्यास निविदा प्रक्रियेस किमान ०७ दिवसांची पहिली मुदतवाढ देण्यात येईल. यावेळीही ३ पेक्षा कमी ग्राहय निविदा प्राप्त झाल्यास, निविदा सादर करण्यास पुन्हा ०७ दिवसांची दुसरी मुदतवाढ देण्यात येईल.

५.१३ दोन्ही मुदतवाढीनंतर ३ किंवा त्यापेक्षा अधिक निविदा प्राप्त झाल्यास लिफाफा "अ" व त्यात पात्र ठरलेल्या निविदाकारांचा लिफाफा ब उघडण्याची कार्यवाही करण्यात येईल.

५.१४ दोन मुदतवाढीनंतरही ३ पेक्षा कमी मात्र किमान एक निविदा प्राप्त झाल्यास, लिफाफा "अ" उघडण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल. व निविदाकार पात्र ठरल्यास "वाहतूक दराचा लिफाफा "ब" विभागीय आयुक्त यांचेसमोर उघडण्यात येईल.व मंजुरीचा निर्णय घेणेत येईल.

५.१५निविदा फॉर्म किंमत रु १०,०००/- एवढी आहे.व निविदा फॉर्म अहस्तांतरणीय राहील.

५.१६ निविदाधारकाने शासन निर्णयातील सर्व तरतुदी लक्षात घेऊन निविदेत दर नमुद करण्यात यावेत. मागाहून दरातील बदलाबाबतची विनंती अथवा कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

**६ निविदा मंजुरीचे प्राधिकार व कार्यपध्दती -**

निविदा प्रक्रिया पारदर्शी पध्दतीने राबविण्यासाठी व वाजवी दर मंजूर होण्याकरीता खालीलप्रमाणे समित्याची स्थापना करण्यात येत आहे.

६.१ जिल्हा / नियंत्रक शिधावाटप स्तर समिती

जिल्हा /नियंत्रक शिधावाटप स्तरावर आधारभूत दरापेक्षा ५ टक्कयापर्यत निविदा मंजूर करण्यास जिल्हा/ नियंत्रण शिधावाटपस्तरीय समिती सक्षम असेल.

६.१.१ जिल्हा/ मनपा स्तरावरील समितीची रचना पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी | सदस्य सचिव |
| ३ | जिल्हा कोषागार अधिकारी | सदस्य |
| ४ | उपप्रादेशिक परिवहन अधिकारी | सदस्य |

६.१.२ जिल्हास्तरीय समितीने निविदा उघडल्यानंतर न्यूनतम निविदा दोन्ही टप्प्याच्या एकूण आधारभूत दराच्या ५ टक्केपेक्षा जास्त या मर्यादेत प्राप्त झाली असेल तर जिल्हास्तरीस समितीने सदर प्रस्ताव योग्य कारणमिमांसेसह राज्य शासन स्तरावरील समितीकडे एक आठवडयाच्या आत सादर करेल. जिल्हा स्तरावरील समितीने त्यांच्या आधिकारात निविदा मंजूर करताना पुढील बाबी विचारात घेण्यात येतील.

६.१.३ जिल्हास्तरावरील समितीने निविदा उघडल्याच्या दिनांकापासून एका कॅलेंडर महिन्याच्या आत दोन्ही टप्प्यासाठी एकत्रित रूपये ८८.०० प्रति क्विंटल या

मर्यादेच्या ५ टक्क्यापर्यत निविदा मंजूर करेल व एक महिन्याच्या आत निर्णय न झाल्यास प्रकरण शासनाकडे सादर केले जाईल.

६.१.४ दर मंजूर करताना ठेकेदाराची मक्तेदारी असणे, तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त होणे, म्हणजेच स्पर्धेचा अभाव असणे, निविदाकारानी कार्टेल तयार करणे इत्यादी बाबींमुळे दर जास्त आलेले नाहीत याची समितीने खात्री करुन तसा अभिप्राय नोंदवून स्थानिक पातळीवर अशा प्रकारच्या वाहतूकीकरीता काय दर आहेत याची स्थानिक दर पत्रके घेऊन समिती खात्री करेल व प्राप्त दर हे मार्केट दरापेक्षा जास्त नसल्याची खात्री करुन ५ टक्क्याच्या मर्यादेमध्ये दर मंजूर करेल.

.६.१.५ असे दर मंजूर करताना निविदाकाराची मक्तेदारी; स्पर्धेचा अभाव व निविदाकारांचे कार्टेल (संगनमत) इत्यादी बाबींमुळे दर जास्त आलेले नाहीत याची खात्री करण्यात येईल.

६.२ राज्य स्तरावरील समिती

आधारभूत दरापेक्षा ५ टक्केपेक्षा जास्त दर प्राप्त झालेल्या निविदांना मंजूरी देण्याचे अधिकार राज्यस्तरीय समितीस आहेत.

६.२.१ राज्य स्तरावरील समिती पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रधान सचिव, अनापु व ग्रासवि | अध्यक्ष |
| २ | उपसचिव (नापु१६अ) | सदस्य सचिव |
| ३ | वित्तीय सल्लागार व उपसचिव | सदस्य |
| ४ | उपसचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ५ | उपसचिव, परिवहन विभाग | सदस्य |

६.२.२असे दर मंजूर करण्यापुर्वी समिती जिल्हा / मनपा स्तरावरील समितीचा अहवाल प्राप्त करुन घेईल व प्राप्त परिस्थितीत व्यवहारीक पातळीवर किती दर असले पाहिजेत याचा अभ्यास करुन समिती निर्णय घेईल.

**७ निविदेतील दरांची विधीग्राहयता -**

७.१ निविदा उघडल्यानंतर दराबाबतचा कोणताही बदल स्विकारण्यात येणार नाही.

७.२ सर्व निविदाकारांची दरपत्रके निविदा उघडण्याच्या तारखेपासून १२० दिवस विधीग्राहय धरण्यात येईल.

७.३ मात्र या कालावधीमधून निविदा प्रक्रियेबाबत न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्यासाठी लागणार कालावधी वगळण्यात येईल.

**८ करारनामा करताना घ्यावयाची काळजी -**

८.१ या शासन निर्णयानुसार जाहीर निविदा प्रक्रिया राबवून निविदा मंजूर करण्यात आलेल्या निविदाधारकासोबत करण्यात येणा-या करारनाम्यास या शासन निर्णयातील सर्व तरतुदी लागू राहतील.

८.२ करारनाम्याच्या प्रत्येक पानावर व दुरुस्तीच्या ठिकाणी जिल्हाधिकारी व वाहतूकदार हे स्वाक्षरी करतील.

८.३ मंजूर निविदाधारकास निविदा मंजूरी नंतर ७ दिवसांच्या आत सर्व कागदपत्रांची पुर्तता रु १००/- च्या स्टॅम्प पेपरवर विहीत नमुन्यात करारनामा करणे बंधनकारक राहील.

८.४ मंजूर निविदाकाराने विहीत मुदतीत करारनामा करण्यास नकार दिल्यास किंवा करारनामा करण्यास टाळाटाळ केल्यास अशा निविदाधारकाची संपुर्ण इसारा रक्कम जप्त करुन नवीन निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल अशा फेरनिविदा प्रक्रियेत पहिल्या निविदेत करारनामा करण्यास नकार देणा-या प्रथम न्यूनतम निविदाकारास प्रतिबंधित करण्यात येईल.

८.५ तथापी काही तांत्रिक कारणास्तव प्रथम न्यूनतम निविदाधारकास विहीत मुदतीत करारनामा करण्यास असमर्थ ठरल्यास व विहीत मुदतीनंतर परंतु नवीन निविदा प्रक्रिया चालू होण्यापुर्वी सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन न्यूनतम निविदाकार करारनामा करण्यास तयार असल्यास अशा निविदाधारकाशी करारनामा करण्यात येईल.

८.६ निविदा सादर केल्यानंतर निविदाकार हा निविदेच्या तसेच करारनाम्यातील तरतुदींना बांधील राहील. न्यूनतम दर असलेल्या निविदाकाराने करारनामा करण्यास नकार दिल्यास अथवा टाळाटाळ केल्यामुळे अथवा आदेश देऊनही काम न केल्यास, शासनाने खर्च करावयाची अतिरीक्त रक्कम, स्‌टेट बॅक ऑफ इंडियाच्या पी.एल.आर (Prime Lending Rate) अधिक २ टक्के व्याजासह निविदाकाराकडून वसूल करण्यात येईल.

**९ कंत्राट कालावधी व मुदतवाढ -**

९.१ निविदा प्रक्रियेतील जी निविदा अंतिम होईल त्या निविदाकारासोबत तीन वर्षाच्या कालावधीकरीता वाहतुकीचा करारनामा करण्यात येईल. निविदाकाराशी ज्या तारखेस करारनामा करण्यात येईल त्या तारखेला कंत्राटाचा कालावधी सुरू होऊन तो पुढील तीन वर्षापर्यत असेल.

९.२ घाऊक किंमत निर्देशांकानुसार होणारी दरवाढ ही करारनामा केलेल्या दिनांकापासून लागू असणार नाही. ती करारनाम्यास एक वर्ष पुर्ण झाल्यानंतर लागू राहील.

९.३ तीन वर्षाचा कंत्राट कालावधी संपण्याअगोदर किमान तीन महिने नवीन निविदा प्रक्रिया सुरू करावी. निविदेसाठी मागील निविदेचा मंजूर दर अधिक ३ वर्षात घाऊक किंमत निर्देशांकामध्ये (WPI) झालेली वाढ/घट मिळून जे दर येतील तेच दर नवीन निविदेकरीता आधारभूत दर म्हणून घेण्यात येतील.

९.४ तीन वर्षानंतर आधारभूत दर हे त्या त्या वर्षीच्या घाऊक किंमत निर्देशांकाच्या दरवाढ/ घट यासह त्या त्या जिल्हयाकरीता वाजवी पातळीवर आलेले असतील यास्तव जिल्हा / मनापा स्तर समितीस आधारभूत दराच्या, तर राज्यस्तर समितीस त्यावरील अधिक दराच्या निविदा मंजूर करण्याचे अधिकार राहतील.

९.५ तीन वर्षाचा कंत्राट कालावधी संपल्यानंतरसुध्दा जर नवीन कंत्राट कालावधी काही अपरिहार्य परिस्थितीमुळे निश्चीत करता आला नाही तर, कंत्राटाचा कालावधी २ महिन्यापर्यंत वाढविण्याचा अधिकार जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांना आहे.

९.६ वाढीव २ महिन्यांच्या कालावधीनंतरही काही अपरिहार्य कारणास्तव पुढील कालावधीकरीता कंत्राट निश्चीत करणे शक्य नसल्यास, त्या कालावधीपर्यंत कंत्राटाचा कालावधी वाढविणेबाबतचा निर्णय शासन स्तरावरून घेण्यात येईल.

**१० निविदाकाराबरोबर Pre- Bid Conference -**

१०.१ निविदा प्रसिध्द केल्यानंतर कंत्राटदारानी निविदा सादर करण्यापुर्वी जिल्हाधिकारी हे इच्छुक निविदाकारांबरोबर Pre- Bid Conference घेतील आणि निविदेतील अटी, शर्ती व कराराच्या कामाची तपशीलवार माहिती निविदाकारास देऊन त्यांचे शंका निरसन करावे. निविदा प्रसिध्द करताना जाहिरनाम्यामध्ये Pre-Bid Conference चा दिनांक २९/०५/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. जिल्हाधिकारी कार्यालय यांचे दालनात आयोजित केलेली आहे.

**११ वाटाघाटीसाठी मार्गदर्शक सूचना -**

११.१ एल-१ व्यतिरिक्त कोणत्याही निविदाकारासोबत वाटाघाटी करण्यात येणार नाहीत. तथापी, एल -१ निविदाकाराबरोबर देखील फक्त खालील परिस्थितीमध्ये वाटाघाटी करता येतील.

११.१.१ जर दर असमर्थनीय असतील किंवा बाजारातील भावांपेक्षा जास्त असतील तर

११.१.२ जर निविदाकारांनी संघ (कार्टेल) स्थापन केला असल्याचा संशय असेल तर

११.१.३ जर निविदा प्रक्रियेत कमीत कमी तीन वैध व्यापारी निविदांचे मूल्यांकन करणे शकय झाले नसेल तर

**१२ देयकांची अदायगी** -

१२.१ दोन्ही टप्प्याच्या वाहतूकीसाठी एकत्रित निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असली तरी देयकांची परिगणना स्वतंत्रपणे म्हणजेच भारतीय खादय निगमचा बेस डेपो ते शासकीय धान्य गोदाम व शासकीय धान्य गोदाम ते शिधावाटप दुकान अशी करण्यात येईल.

१२.२ मनपा क्षेत्रातील थेट वाहतूकीसाठी देयकांची परिगणना भारतीय खादय निगमचा बेस डेपो ते शिधावाटप दुकान अशी करण्यात येईल.

१२.३ वाहतूकीच्या ज्या टप्प्याची जितकी क्विंटल वाहतूक झाली असेल त्याच्या मंजूर दरानुसार देयकाची अदायगी करण्यात येईल.

१२.४ पहिल्या व दुस-या टप्प्याची स्वतंत्र वाहतूक देयके वाहतूक कंत्राटदाराने वाहतूक पासच्या आधारे तालुका कार्यालयास, मनपा क्षेत्रासाठी अन्नधान्य वितरण अधिकारी यांचेकडे ही सर्व देयके महिनानिहाय नियमीत सादर करावीत.

१२.५ कंत्राटदाराच्या देयकातून केंद्र शासनाच्या प्रचलीत नियमानुसार आयकर तसेच, इतर सर्व शासकीय अनिवार्य वजाती वसूल केल्यानंतरच देयकांची अदायगी करण्यात येईल.

**१३ धान्याची अफरातफर / काळाबाजार करण्यास प्रतिबंध** - १३.१ करारनामा करतेवेळी निविदाधारकाने सादर केलेल्या मालकीच्या व नियंत्राणाखालील वाहनांच्या यादी व्यतिरिक्त वाहतुकदारने वाहतुकीकरीता अतिरीक्त वाहने उपलब्ध करुन दिल्यास अशा वाहनांच्या नोंदणी क्रमांकासह यादीस जिल्हाधिकारी यांनी लेखी मान्यता देतील.अशा वाहनांव्यतिरिक्त अन्या वाहनांमध्ये वाहतूक प्रतिनिधिनी धान्य भरुन देण्यात येवू नये.

१३.२ मान्यता प्राप्त वाहनाव्यतिरिक्त इतर वाहनामधून वाहतूक केल्यास सदरची धान्य वाहतुक अवैध मानण्यात येऊन,संबधित वाहतुक कंत्राटदार,जिल्हा वाहतुक प्रतिनिधीव सर्व संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

१३.३ लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंर्तगतच्या कोणत्याही अन्न्धान्य व इतर जीवनावश्यक वस्तुच्या वाहतुकी दरम्यान वाहतुक कंत्राटदाराकडून अफरातफर होणार नाही याची जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

१३.४ वाहतुकीदरम्यान वाहतुक कंत्राटदाराचे प्रतिनिधी,चालक,वाहक,हमाल इ.यांचेकडून होणा-या कोणत्याही प्रकारच्या अफरातफर/काळाबाजारास ते व्यक्तीश: जबाबदार असतील.त्यांची तशी जबाबदारी निश्चीत झाल्यास अधिनियमानुसार त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल.व त्यांना कामावरुन काढून टाकणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

१३.५ अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंची अफरातफर /काळाबाजार प्रकरणी वाहतूक कंत्राटदार किंवा त्याचे प्रतिनिधी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दोषी आढळल्यास संबंधिताविरुध्द जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ अंर्तगत गुन्हा दाखल करण्यात येऊन अपहारीत धान्याची किंमत बाजारभावाच्या दुप्पट दराने वाहतुकदाराकडून वसुली करण्यात येईल.अशा घटनेची दुस-यांदा पुनरावृत्ती झाल्यास जिवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येऊन बाजारभावाच्या तिप्पट दराने वसुली करण्यात येईल. कंत्राट कालावधीत तिस-यांदा याची पुनरावृत्ती झाल्यास, संबंधीत वाहतूकदारावर जिवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत गुन्हा नोंदवून वाहतूक कंत्राटदाराचे रदद करणे अपरिहार्य असेल असे मा. जिल्हाधिकारी यांचे मत झालेले असेल तपशीलवार स्पष्टीकरणासह प्रस्ताव शासनस्तरावर पुढील कार्यवाहीस्तव शासनास सादर केला जाईल.

१३.६ अन्नधान्य व इतर जिवनावश्यक वस्तुंचा अफरातफर/काळा बाजार प्रकरणी वाहतूक कंत्राटदारावर जिवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत गुन्हा दाखल करुन कलम ६(अ) अन्वये जप्त मुददेमालाच्या विल्हेवाटीचा कार्यवाही करण्यात येईल.

**१४ ट्रक लोडिंगबाबत दक्षता -**

१४.१ वाहतूक चालकाने कंत्राटदाराचे लेटर हेडवर विशिष्ट ट्रक भरून घेण्याबाबतचे प्राधिकारपत्र सादर केल्यानंतरच ट्रक भरून देणेत येईल.

१४.२ वाहनचालकाचा परवाना व त्यावरील फोटो याची काळजीपुर्वक तपासणी करुन वाहनचालक म्हणून हजर असलेली व्यक्ती व प्राधिकारपत्रात नमुद केलेली व्यक्ती एकच असल्याची खातरजमा केली जाईल.

१४.३ कंत्राटदाराकडून प्राधिकारपत्र विहीत नमुन्यात वरील बाबीचा उल्लेख करुन भरुन घेण्यात येईल.

**१५. वाहतूकदाराने अन्नधान्य व्यपगत केल्यास करावयाची कारवाई -**

१५.१ विहीत मुदतीत अन्नधान्याची उचल न केल्यामुळे व्यपगत झालेल्या अन्नधान्याची बाजारभावाने होणा-या किंमतीच्या १० टक्के दंड कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येईल.

१५.२ एका वर्षात तीन पेक्षा अधिकवेळा अन्नधान्य व्यपगत करणा-या अकार्यक्षम वाहतूक कंत्राटदाराचे कंत्राट रदद करण्याची कारवाई करण्यात येईल.

**१६ घाऊक किंमत निर्देशांकानुसार प्रमाणशीर दरवाढ/ दरघट मंजूर करणे -**

१६.१ निविदेव्दारे अन्नधान्य कंत्राट निश्चीत झाल्यानंतर मंजूर दरावर वाहतूक कंत्राटाच्या कालावधीत घाऊक किंमत निर्देशांकानुसार प्रमाणशीर दरवाढ/ घट देण्यात येईल.याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१६.२ घाऊक किंमत निर्देशांकानुसार प्रमाणशीर दरवाढ/दरघट कंत्राट कालावधी १ वर्षाच्या कालावधीनंतर प्रत्येक वर्षी परीगणित करणेत येईल. परंतु सदर दरवाढ पहिल्या एक वर्षाच्या कालावधीकरीता लागू राहणार नाही.

१६.३ घाऊक किंमत निर्देशांकाबाबतची माहिती eaindustry.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर परिगणनेसाठी केवळ या अधिकृत संकेतस्थळावरील माहिती वापरण्यात येईल.

१६.४ कंत्राटाचा करारनामा ज्या महिन्यात करण्यात येईल त्या महिन्याचा सर्व वस्तूसाठीचा घाऊक किंमत निर्देशांक (Wholesale Price Index for all commodities) आधार धरण्यात येईल.

१६.५ कंत्राट कालावधीच्या १३ व्या महिन्याचा घाऊक किंमत निर्देशांक (Wholesale Price Index for all commodities) घेण्यात येईल.

१६.६ घाऊक किंमत निर्देशांकानुसार प्रमाणशीर दरवाढ/ दरघट खालीलप्रमाणे परिगणीत करण्यात येईल.

दरवाढ / दरघट = १६.५ नुसार WPI - १६.४ नुसार WPI * १००= क्ष टक्के

१६.७ अशा प्रकारे वाहतूक कंत्राटदारास मंजूर दराच्या क्ष टक्के वाढ देण्यात येईल. म्हणजेच वाहतूक कंत्राटदारास आधारभूत दराने कंत्राट मंजूर झाले असल्यास त्यास १३ व्या महिन्यापासून आधारभूत दर + क्ष टक्के इतकी दरवाढ देण्यात येईल.

१६.८ WPI मध्ये घट झाली असल्यास उपरोक्त सुत्रानुसार परिगणना करुन वजा टक्केवारी प्राप्त होईल. त्याप्रमाणात दरघट करण्यात येईल.

१६.९ त्यापुढील वर्षी देखील उपरोक्त कार्यपध्दती वापरून मुळ मंजूर आधारभूत दरावर दरवाढ /दरघट परिगणीत करण्यात येईल व त्याचे प्रदान करताना आधारभूत दर + क्ष+ य टक्के इतकी दरवाढ लागू राहील.

१६.१० सदर परिगणनेनुसार कंत्राट कालावधी वाहतूक कंत्राटदारास मंजूर दरावर दरवाढ/ दरघट करण्याबाबतचे संपुर्ण अधिकार मा. जिल्हाधिकारी यांचे राहतील.

१६.११ कंत्राटाचा कालावधी आणीबाणी व निकडीच्या प्रसंगी ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी वाढवावा लागल्यास वरीलप्रमाणे वाढीव कालावधीसाठी दरवाढ/ दरघट लागू राहील.

**१७ आणीबाणी व निकडीच्या प्रसंगी वाहतूक -**

१७.१ वाहतूक कंत्राटाच्या निविदेस वर्तमानपत्रात/महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर विस्तृत प्रसिध्दी दिल्यानंतरदेखील कंत्राट निश्चीत करणे शक्य नसल्यास वाहतूकीसाठी खालील पर्यायानुसार व्यवस्था करण्यात येईल.

१७.२ वाहने अधिग्रहित करुन वाहतुकीचे काम करण्यात येईल, अन्यथा

१७.३ अन्नधान्य वाहतूकीकरीता उपलब्ध होऊ शकणारी अन्य विभागाची वाहने/ वापरण्यात यावी याकरीता संबंधीत विभागाने विहीत केलेल्य कार्यपध्दतीनुसार इंधन/वाहनाचे भाडे इत्यादी खर्च मा. जिल्हाधिकारी मंजूर करु शकतील. वाहतूकीसाठी आकारण्यात आलेले भाडे संबंधीत विभागाने विहीत केलेल्या दरानुसार आहेत याची खातरजमा करण्यात येऊन विहीत केलेल्या भाडयाने इंधन, दुरूस्ती आदि खर्च समाविष्ट असेल व हा खर्च करण्यात आलेला असेल तर तो खर्च वाहतूक देयकातून वजा करण्यात येईल.

१७.४ तसेच कंत्राट कालावधी संपल्यानंतर न्यायालयीन प्रकरणामुळे व अन्य कारणास्तव नवीन निविदा प्रक्रिया सुरू न करता आल्यास अशा वेळी कार्यरत कंत्राटदारास कार्यरत दरामध्ये २ महिन्याची मुदतवाढ देण्यात येईल. तदनंतर पुढील कालावधीसाठी वरीलप्रमाणे वाहतूकीची पर्यायी व्यवस्था करण्यात येईल.

१७.५ वाहतूक त्वरेने व कार्यक्षमतेने होण्यासाठी अतिरिक्त कंत्राटदार नियुक्त करण्याचे गरज भासल्यास किंवा नियुक्त कंत्राटदार वाहतुकीचे काम करण्यास अकार्यक्षम ठरल्यास अशावेळी वरीलपैकी उपलब्ध पर्यायाने वाहतूकीची व्यवस्था करण्यात येईल. तथापी पर्यायी व्यवस्था करावी लागल्यास त्याकरीता आलेल्या जादा खर्चाची वसुली अपयशी कंत्राटदाराकडून करण्यात येईल.

**१८ करारनाम्यातील तरतुदीसंदर्भात वाद विवाद व अपील** -

१८.१ करारनाम्याच्या कालावधीत किंवा तदनंतर करारनाम्यातील तरतुदीसंदर्भात तसेच दंड, वसुली इ. संदर्भात मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द, निर्णय दिल्याच्या दिनांकापासून ३० दिवसात वाहतूक कंत्राटदार संबंधीत विभागीय आयुक्त यांचेकडे दाद मागू शकेल.

१८.२ विभागीय आयुक्त यांचे निर्णयाने समाधान न झाल्यास, आदेश पारीत झालेल्या दिनांकापासून ३० दिवसात विभागीय आयुक्त यांच्या निर्णयाविरुध्द वाहतूक कंत्राटदार शासनाकडे अपील करु शकेल.

१८.३ निविदाकार /वाहतूकदार यांनी आपल्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी उपलब्ध असणारे वैध मार्गाचा अवलंब केल्याशिवाय त्यांना न्यायालयात दाद मागता येणार नाही.

**खुल्या निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक -**

| **अ क्र** | **कार्यवाहीचे टप्पे** | **दिनांक** |
|---|---|---|
| १. | ई- निविदा सूचना प्रसिध्द करणे (जाहिरात) | दि. २५/०५/२०१७ |
| २. | Pre-Bid Conference | दि. २९/०५/२०१७ दुपारी 3.०० वाजता (जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर) |
| ३. | ई-निविदेची सर्व प्रक्रीया राबविणे | दि.२५/०५/२०१७ ते १५/०६/२०१७ |
| | अ) इसारा रक्कम भरलेचा पुरावा (जिल्हा पुरवठा कार्यालय, अहमदनगर) कार्यालयात सादर करणे | इसा-याची रक्कम ऑनलाईन/धनाकर्ष रुपात भरण्यात यावी. |
| | ब) निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि.१५/०६/२०१७ (दुपारी २.०० वाजेपर्यत) |
| | क) निविदा उघडणे | दि.१६/०६/२०१७(दुपारी ३.०० वाजता) |
| ४. | अ) जिल्हा स्तरावर निविदा मंजुरीबाबत निर्णय घेणे | आठ दिवसाचे आत निविदा (निविदा उघडल्यानुसार) |
| | जिल्हास्तरावर निश्चीत होणा-या (आधारभूत दरापर्यतच्या) निविदाकारांबरोबर करारनामा करणे व काम सुरू करण्याची दिनांक | (७ दिवसाच्या आत) निविदा मंजूर झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत |
| ५ | अ) पहिल्या निविदाप्रक्रियेत ३ पेक्षा कमी ग्राहय निविदा प्राप्त झाल्यास<br>ब) दुस-या निविदा प्रक्रियेत ३ पेक्षा कमी ग्राहय निविदा प्राप्त झाल्यास | ७ दिवसांची मुदतवाढ देण्यात येईल. |

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडील शासन निर्णय क्र. कंत्राट १०१६/प्रक्र१६९/नापु१६अ दि.२० एप्रील २०१७ मध्ये नमुद कार्यपध्दती, अटी व शर्ती निविदाधारकांना बंधनकारक असतील.

टीप - शासकीय सुटटीच्या दिवशी निविदासंबंधी कामकाज बंद राहील.

क्र. पुरवठा/कार्याजिपु११/२७०/२०१७
अहमदनगर दि. २३/०५/२०१७

**(अभय महाजन)**
**जिल्हाधिकारी अहमदनगर**

# जिल्हाधिकारी, अहमदनगर

## ई-निविदा सूचना सन २०१७-२०२०

जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्याकडून अहमदनगर जिल्हयासाठी लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत धान्य उपलब्धततेच्या हमीकरीता निश्चीत केलेल्या सुधारीत वितरण पध्दतीनुसार सन २०१७ ते २०२० या कालावधीसाठी अन्नधान्य व इतर जिवनावश्यक वस्तूंचे वाहतुक कंत्राट निश्चीत करणेबाबतच्या प्रणालीतील नवीन वाहतूक पध्दतीनुसार सर्व प्रकारच्या अन्नधान्याची त्याचप्रमाणे साखरेची शिधावाटप दुकानापर्यंत वाहतुक करणेसाठी (थेट वाहतूक, पहिला टप्पा, दुसरा टप्पा) एकाच वाहतूकदारामार्फत शासकीय खर्चाने विविध योजनेतील अन्नधान्य व इतर जिवनावश्यक वस्तूंची रस्त्याने वाहतूक करणेकामी इच्छुक वाहतूक कंत्राटदाराकडून ई-निविदा दि.२५/०५/२०१७ ते दि.१५/०६/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत ई-निविदा (ऑनलाईन) पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

मुदतीत आलेल्या निविदा जिल्हाधिकारी, अहमदनगर अगर यांचे प्रतिनिधी दि. १६/०६/२०१७ रोजी दुपारी ३.०० जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे उघडतील त्यावेळी सर्व इच्छुक निविदाधारकांनी अगर त्यांच्या अनुपस्थितीत त्यांनी लेखी प्राधिकार प्रतिनिधींनी हजर रहावे.

निविदेचा नमुना त्यातील अटी व शर्ती इत्यादी तपशील जिल्हाधिकारी कार्यालय (पुरवठा शाखा), यांचे कार्यालयात दि. २५/०५/२०१७ ते दि.१५/०६/२०१७ पर्यंत कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

निविदासंबंधीची सर्व माहिती व अटी-शर्ती http://mahatenders.gov.in व www.ahmednagar.nic.in या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

निविदा फॉर्मची किंमत रु १०,०००/- एवढी आहे. इच्छुक निविदाकारांनी ई-निविदा प्रक्रियेत भाग घेणे सुलभ होणेसाठी जिल्हाधिकारी अहमदनगर कार्यालयात Support Team for E- Tendering I.T. Department मार्फत दि.२९/०५/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता Pre Bid Conference व प्रशिक्षण आयोजित केलेले आहे.

क्र.पुरवठा/कार्या-जिपु११/२७०/२०१७

अहमदनगर दि. २३/०५/२०१७ **जिल्हाधिकारी अहमदनगर**

विषय - लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत धान्य उपलब्धतेच्या हमीकरीता निश्चीत केलेल्या सुधारीत वितरण पध्दतीनुसार सन २०१७ ते २०२० या कालावधीसाठी अन्नधान्य व इतर जिवनावश्यक वस्तूंचे वाहतुक कंत्राट निश्चीत करणेबाबत.

संदर्भ - जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचे निविदा सूचनाप्रमाणे पुरवठा/कार्या/जिपु११/२७०/२०१७ दि. २३/०५/२०१७

---

क्र पुरवठा/कार्या जिपु११/२७१/२०१७ अहमदनगर दि. २३/०५/२०१७

---

जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडून सन २०१७-२०२० या कालावधीसाठी लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत धान्य उपलब्धततेच्या हमीकरीता निश्चीत केलेल्या सुधारीत वितरण पध्दतीनुसार अन्नधान्य व इतर जिवनावश्यक वस्तूंची रस्त्याने वाहतूक करणेकामी इच्छुक वाहतूक कंत्राटदाराकडून वाहतूक करणेसाठी वाहतूक कंत्राट निश्चीत करणेसाठी जिल्हा अंतर्गत वाहतूकीसाठी वाहतूकदाराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहे.

जिल्हा अंतर्गत वाहतूकीसाठी एकच निविदा इच्छुकांनी दाखल करावी.

| | | |
|---|---|---|
| १. | ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने भरणे | अ) दि.१५/०६/२०१७ दुपारी २.०० वाजेपर्यत<br>ब) ठिकाण जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे कार्यालय<br>क) अर्जाची किंमत - रुपये १०,०००/-<br>अक्षरी रूपये दहा हजार मात्र |
| २. | इसा-याची रक्कम | थेट वाहतूक रुपये १० लक्ष<br>पहिल्या व दुस-या टप्प्याची वाहतूक रु १५ लक्ष |
| ३. | निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक- | दि. १५/०६/२०१७ |
| ४. | निविदा उघडणे | - दि. १६/०६/२०१७ दुपारी ३.०० वाजता<br>ठिकाण जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे कार्यालय |

टिप - निविदेचा विहीत नमुना व अटी व शर्ती संबंधीत सर्व प्रकारची जिल्हा पुरवठा कार्यालय अहमदनगर येथे कार्यालयीन वेळेत व कामकाजाच्या दिवशी पहावयास मिळेल. प्राप्त झालेल्या संपुर्ण निविदा अगर निविदेचा काही भाग स्विकारण्याचा अगर कोणतेही कारण न देता कोणतही निविदा नाकारण्याचा अधिकार जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी राखून ठेवला आहे निविदेसोबत इतर अटी व शर्तीसाठी दि. २५/०५/२०१७ च्या दैनिकची आवृत्ती पहावी.

स्थळप्रतीवर मा.जिल्हाधिकारी
यांची स्वाक्षरी असे.

ठिकाण - अहमदनगर

दिनांक - २३/०५/२०१७ जिल्हाधिकारी अहमदनगर करीता